पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८
माहिती व तंत्रज्ञान विभाग
क्र.- मातंवि/८/कावि/३५०/२०१५
दिनांक - ९/११/२०१५

**परिपत्रक**

**विषय - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या www.pcmcindia.gov.in या वेबसाईटवरील माहिती प्रसिद्धीबाबत.**

पिंपरी चिंचवड महानगरापलिकेची वेबसाईट www.pcmcindia.gov.in या नावाने कार्यान्वित असुन सदर वेबसाईटवर महापालिकेच्या विविध विभागांशी संबंधित माहिती (उदा.निविदा, कोटेशन,विविध योजना तसेच नागरिकांना देण्यात येणा-या सेवा, RTI अंतर्गत प्रसिध्द करावयाची माहिती इ.) वेळोवेळी प्रसिध्द करणेत येते. सदर माहिती संबंधित विभागाकडुन प्राप्त झाल्यानंतर माहिती व तंत्रज्ञान विभागामार्फत वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात येते. सदरची प्रसिध्द होणारी माहिती नागरिकांना योग्यप्रकारे व अचुक माहिती वेळेत प्राप्त व्हावी या उद्देशाने प्रसिध्द करणेत येते.

सदर परिपत्रकान्वये सर्व विभागांना कळविणेत येते की, आपले विभागाशी संबंधित माहिती वेबसाईटवर प्रसिद्ध करावयाच्या दोन दिवस ( Working Days) अगोदर माहिती व तंत्रज्ञान विभागाकडे देण्यात यावी. विषयाशी संबंधित जी माहिती (उदा. Schedule B, Terms & Condition, Drawings) वेबसाईटवर प्रसिद्धीसाठी पाठविणेत येणार आहे ती एकाच वेळी विभागप्रमुखांच्या स्वाक्षरीने हार्डकॉपी व सॉफ्टकॉपी मध्ये माहिती व तंत्रज्ञान विभागाकडे देण्यात यावी म्हणजे सदरची माहिती वेळेत प्रसिध्द करणे शक्य होईल. तसेच आपले विभागाशी संबंधित माहिती विहित मुदतीत प्रसिद्ध झाली अथवा नाही याची खातरजमा करुन संबंधितांनी माहिती प्रसिद्ध झालेबाबतची प्रिंट काढुन ठेवावी.

तसेच प्रत्येक विभागास त्यांच्या विभागासंबंधित माहिती (उदा.परिपत्रके, आदेश व इतर माहिती) वेबसाईटवर प्रसिध्द करणे व ती वेळोवेळी अद्ययावत करण्याचे अधिकार देणेत आलेले आहेत. त्यानुसार सर्व विभागांनी वेबसाईटवरील आपले विभागाशी संबंधित माहिती वेळोवेळी अपडेट करण्याची दक्षता घ्यावी. विहित मुदतीत संबंधित माहिती प्रसिद्ध झाली नाही तर त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत विभागाची राहील याची नोंद घेणेत यावी.

विभाग प्रमुखांनी सदरचे परिपत्रक सर्व अधिकारी/कर्मचारी यांचे निदर्शनास आणुन द्यावे.

आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११०१८